दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे    सहसंपादक : तुकाराम कामठे

या गुढी पाडव्याला आपल्या घराला द्या नवीन आणि आधुनिक साज!
इंटेरिअर डिझायनर श्रेया निलाखे
घर, फ्लॅट व ऑफिससाठी आकर्षक आणि आधुनिक इंटेरिअर डिझाईन.
- आधुनिक व मिनिमल डिझाईन
- स्मार्ट स्पेस प्लॅनिंग
- बजेटमध्ये सुंदर इंटेरिअर सोल्युशन्स
संपर्क: 75-59-26-16-75

वर्ष ५ । अंक १७५ । सोमवार ३० मार्च २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २    https://epaper.dainkaakarshan.com    E-mail- dainikaakarshan@gmail.com    RNI NO. MAHMAR/2021/84322

## व्हाईट कॉलर ठगांना कायद्याची चपराक

# नगर अर्बनचे भ्रष्टाचारी अध्यक्ष, संचालक, अधिकारी व कर्जदारांच्या मालमत्ता जप्त

**बँक बचाव समितीची पत्रकार परिषदेत माहिती । सहकार चळवळीतील एक आदर्श व दिशादर्शक निर्णय असल्याची व्यक्त केली भावना**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर– नगर अर्बन बँक बुडविण्यास कारणीभूत असणारे, संगनमताने भ्रष्टाचार करणारे चेअरमन, संचालक, वरिष्ठ अधिकारी व काही कर्जदारांच्या मालमत्ता महाराष्ट्र शासनाकडून जप्त करण्यात आल्याची माहिती बँक बचाव समितीच्या वतीने सोमवारी पत्रकार परिषद घेऊन देण्यात आली. हा निर्णय सहकार चळवळीतील एक आदर्श व दिशादर्शक निर्णय असून, याकामी बँक बचाव समितीचा पाठपुरावाही महत्त्वपूर्ण ठरल्याचे यावेळी सांगण्यात आले.**

पत्रकार परिषदेत बँक बचाव समितीचे राजेंद्र गांधी, राजेंद्र चोपडा, ॲड. अच्युत पिंगळे, डी. एम. कुलकर्णी यांनी माहिती देताना सांगितले की, नगर अर्बन बँकेचे चेअरमन, संचालक, वरिष्ठ अधिकारी हे सातत्याने संगनमत करून, भ्रष्ट कारभार करून संस्थेचे अस्तित्व व स्वनिधी, ठेवीदारांचे ठेवी धोक्यात आणत होते, त्याची शासनाकडून तसेच रिझर्व्ह बँकेकडून वेळोवेळी दखल घेण्यात आली व कारभारात सुधारणा करण्यासाठी अनेक संधी देण्यात आल्या होत्या. तथापि भ्रष्टाचार व लुटमारीला सोकावलेले पदाधिकारी व अधिकारी यांनी भ्रष्टाचार सुरुच ठेवला. तसेच भ्रष्टाचार बंद करण्याऐवजी बँकेला खोटे मल्टीस्टेट करुन व मल्टीस्टेट कायद्यातील त्रुटींचा गैरफायदा घेत २०१४ नंतर भ्रष्टाचारात प्रचंड वाढ केली व त्याची परिणीती म्हणून २०२३ मध्ये बँकेचा परवाना रद्द झाला. ठेवीदारांच्या ठेवी अडकल्या व त्यामध्ये बँकेचा ११४ वर्ष साचविलेला जवळपास १७५ कोटी रुपयांचा खूप मोठा स्वनिधी बुडाला. सन २०१७ पासून सभासदांचा लाभांश बुडाला, कर्मचा–यांचा रोजगार गेला, परंतु ज्यांनी लूटमार केली त्यांच्यावर कोणतीही ठोस कारवाई झालेली नव्हती. गैरव्यवहार व भ्रष्टाचाराबाबत त्यांच्याविरुध्द अनेक फौजदारी स्वरुपाचे गुन्हे दाखल झाले, पोलिस तपासातून भ्रष्टाचाराचे सर्व धागेदोरे उघड झाले. परंतु तरीदेखील संबंधित आरोपी हे उजळ माथ्याने विविध न्यायालयापासून जामीन किंवा अटकपूर्व जामीनाची सवलत मिळवत व न्यायालयात तारीख पे तारीख करून समाजामध्ये फिरत आहेत, असे बँक बचाव समितीच्या वतीने सांगण्यात




### १८ मार्चला निघाली अधिसूचना

महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाकडून सदर प्रकरणाची गंभीर दखल घेताना सदर प्रकरणातील संबंधित आरोपी संचालकांच्या, अधिका–यांच्या व काही कर्जदारांच्या मालमत्ता जप्त करण्यासंबंधी दिनांक १८ मार्च २०२६ रोजी अधिसूचना जारी करून त्याद्वारे जप्त करण्यात आल्या आहेत. या सर्व मालमत्तांची अंदाजे एकत्रितरीत्या किंमत १०० कोटी रुपयांपेक्षा जास्त असावी. तसेच याबाबत आणखीही काही आरोपींची मालमत्ता जप्तीची कारवाई सुरु आहे, असे पत्रकार परिषदेत सांगण्यात आले.

### बँक पुन्हा सुरू करण्यासाठी बँक बचाव समिती प्रयत्नशील

सर्वसामान्यांच्या हितार्थ बँक बचाव समिती नेहमी प्रयत्नशील आहे. त्यामुळे ठेवीदारांचे पूर्ण पैसे परत मिळवून दिल्यानंतर ११४ वर्षाचा वैभवशाली इतिहास असलेली नगर अर्बन बँक पुन्हा सुरु होण्यासाठी बँक बचाव समिती प्रयत्नशील आहे. तसेच जप्त मालमत्तांबाबत पुढील कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून या मालमत्तांचा लवकरात लवकर लिलाव करण्यासाठी बँक बचाव समिती प्रयत्नशील असल्याचेही पत्रकार परिषदेत सांगण्यात आले.

### ठेवीदारांना ८५ टक्क्यांपर्यंत रक्कम मिळवून देण्यात यश

तथापि बैंक बचाव समितीने या गंभीर प्रकरणाबाबत शासन दरबारी तसेच न्यायालयात पाठपुरावा करत अवसायकांचे सहाय्याने बँकेची जोरदार वसुली केली व ठेवीदारांना न्याय मिळवून देताना त्यांच्या ७० टक्क्यापर्यंत ठेवी परत मिळवून दिल्या आहेत. उर्वरित ३० टक्क्यापैकी १५ टक्के ठेवीची रक्कम एप्रिल २०२६ मध्ये परत मिळणार आहे. तसेच शेवटची १५ टक्के रक्कमही ठेवीदारांना परत मिळवून देण्यासाठी देखील बैंक बचाव समितीचा लढा चालूच राहिल. अशाप्रकारे मोठ्या प्रमाणावर ठेवी मिळवून देण्याचे हे संपूर्ण भारतातील एकमेव उदाहरण आहे. ठेवीदारांचे पैसे, व्याज, बँकेचा स्वनिधी, सभासदांचा लाभांश, कर्मचा–यांचे भविष्य सुरक्षित करणे, बँकेचे व्यावसायिक नुकसान भरून काढणे आदी बाबींची भरपाई जप्ती प्रक्रियेतून होणार आहे, याद्वारे बँक लुटून बुडविणारे व्हाईट कॉलर गुन्हेगार कोण आहेत हे देखील आता स्पष्टपणे समोर आले आहे, असे पत्रकार परिषदेत सांगण्यात आले.

### मालमत्ता जप्तीची कारवाई झालेल्यांची नावे याप्रमाणे

- सुरेश शिवराम सातपुते (रा. केडगाव, नगर) एकूण पाच शेतजमीन मालमत्ता.
- कर्जदार मनोज वासुमल मोतियानी (रा. सावेडी, नगर) एकूण तीन मालमत्ता. त्यात दोन फ्लॅट व आठ व्यावसायिक गाळे.
- केशव भाऊसाहेब काळे (रा. सावेडी, नगर) एकूण दोन मालमत्ता. त्यात दोन प्लॉट.
- विनोदकुमार अण्णासाहेब श्रीखंडे (रा. नगर शहर). एक कार्यालय मालमत्ता.
- संचालक अनिल चंदूलाल कोठारी (रा. नगर शहर). गोडावूनसह सात गाळे. प्लॉट, सावेडीतील दोन ठिकाणची शेतजमीन.
- व्यवस्थापक महादेव पंढरीनाथ साळवे (सावेडी, नगर). एक प्लॉट.
- संचालक अजय अमृतलाल बोरा (सावेडी, नगर). एक प्लॉट, तीन गाळे.
- कर्जदार रवींद्र विठ्ठल कडूस (सावेडी, नगर). फ्लॅट.
- व्यवस्थापक सतीश विठ्ठल रोकडे (सावेडी, नगर). एक प्लॉट.
- संचालक मनेष दशरथ साठे (माळीवाडा, नगर). एक प्लॉट.
- संचालक गिरीश केदारनाथ लाहोटी (नगर शहर). चाहुराणा बुद्रुक येथील दोनमजली इमारत. कोरडगाव (ता. पाथर्डी) येथील तीन शेतजमीन मिळकत.
- व्यवस्थापक राजेद्र केशवराव डोळे (सावेडी, नगर). सावेडीतील एक फ्लॅट.
- संचालक नवनीत शांतीलाल सुरपुरीया (नालेगाव, नगर). दोन व्यावसायिक गाळे.
- प्रगती देवेंद्र गांधी (रा. कॅम्प, नगर. तत्कालीन चेअरमन माजी खासदार दिवंगत दिलीप गांधी यांची सूनबाई). कॅम्प नगर येथील बंगला.
- सरोज दिलीप गांधी (तत्कालीन चेअरमन माजी खासदार दिवंगत दिलीप गांधी यांची पत्नी). चाहुराणा बुद्रुक येथील प्लॉट.
- संचालक शैलेश सुरेश मुनोत (रा. नगर शहर). नगर येथील प्लॉट बक्षीसपत्राद्वारे पत्नीच्या नावे केलेला.
- संचालक दिनेश पोपटलाल कटारिया (रा. नगर शहर). नगर येथील प्लॉट.
- कर्जदार अक्षय राजेंद्र लुणावत (रा. सावेडी, नगर). सदनिका व व्यावसायिका दोन ऑफीस गाळे.
- केदार मुरलीधर लाहोटी (रा.चाहुराणा बुद्रुक, नगर). एक प्लॉट.
- शिवदास दिलीप गायकवाड (रा. श्रीगोंदा). चार ठिकाणच्या शेतजमिनी.
- सचिन दिलीप गायकवाड (रा. श्रीगोंदा). श्रीगोंद्यातील पाच ठिकाणच्या शेतजमिनी.
- संचालिका दीप्ती सुवेंद्र गांधी (तत्कालीन चेअरमन माजी खासदार दिवंगत दिलीप गांधी यांची सूनबाई). पाथर्डीतील शेतजमीन.
- देवेंद्र दिलीप गांधी (तत्कालीन चेअरमन माजी खासदार दिवंगत दिलीप गांधी यांचे सुपुत्र). वांजोळी (ता. नेवासा) या ठिकाणच्या तीन शेतजमिनी.
- सुवेंद दिलीप गांधी (तत्कालीन चेअरमन माजी खासदार दिवंगत दिलीप गांधी यांचे सुपुत्र). वांजोळी (ता. नेवासा( येथील सहा ठिकाणच्या शेतजमिनी.
- संदीप ईश्वरदास वाघमारे. राहाता तालुक्यातील नांदुर्खी येथील सहा ठिकाणच्या शेतजमिनी व एक शिर्डी शहरातील शेतजमीन.
- रवींद्र विठ्ठल जेजुरकर. ममदापूर ता. राहाता येथील दहा ठिकाणच्या शेतजमिनी.
- संचालक अशोक माधवलाल कटारिया. टाकळी ढोकेश्वर, ता. पारनेर येथील एक प्लॉट व चार ठिकाणच्या शेतजमिनी.
- राजेंद्र बहिरू म्हस्के. कोटक महिंद्रा बँक शाखा सावेडी येथील बँकखाते सील.
- आशुतोष सतीश लांडगे. रेणुकामाता मल्टीस्टेट नगरमधील बँकखाते सील.

अजून आठ ते दहा संचालकांच्या तसेच इतर कर्जदारांच्या मालमत्ता जप्तीची कार्यवाही अजून सुरू आहे.

# पोखर्डीत कोंबड्याच्या झुंजीचा जुगार लावणारे २१जण ताब्यात



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील पोखर्डी शिवारात कोंबड्यांच्या झुंजी लावून त्यावर जुगार खेळणा–या २१ जणांना स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने जेरबंद केले आहे. दिनांक २९ रोजी गोपनीय माहिती मिळाली की, पोखर्डी गावच्या शिवारातील पिंपळगाव उजैनी रोडवरील एका मोकळ्या जागेमध्ये कापडी मंडप टाकून त्यामध्ये काहीजण पैशावर कोंबड्यांची झुंज लावून त्यावर जुगार खेळत आहेत.

त्यानुसार पथकाने पोखर्डी शिवारात जाऊन खात्री केली असता एका मोकळ्या जागेमध्ये कापडी मंडपामध्ये काहीजण कोंबड्यांची झुंज लावत असतांना व तेथे जमलेल्या लोकांपैकी काहीजण झुंजीवर पैसे लावत असतांना दिसून आले. या कारवाईत २४ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी तसेच तपास पथकातील सपोनि हरीश भोये, उपनिरीक्षक अनंत सालगुडे, उपनिरीक्षक समीर अभंग, पोलीस अंमलदार सुरेश माळी, विष्णू भागवत, भिमराज खर्से, प्रशांत राठोड, सागर ससाणे, चालक उमाकांत गावडे यांच्या पथकाचा सहभाग होता.

### आरोपींमध्ये काहीजण मुंबई, पुणे, नाशिकचे

पथकाने छापा टाकून शुभम राजेश बोध (वय–२७ वर्षे रा. झेंडीगेट, नगर), आशरफ बाहुला खान (वय–५० वर्षे रा. आलमगीर नगर), मोहम्मद उस्मान अली शेख (वय–४० वर्षे रा. महिम उन्नती सोसायटी मुंबई), अमजद युसुफ मगदुम (वय–४३ वर्षे रा. येरवडा पुणे), सय्यद अझर अक्तर (वय–४० वर्षे रा. पंचपीर चावडी नगर), रोहीत श्रीचंद गोहिर (वय–३३ वर्षे रा. दरेवाडी, ता.जि. नगर), संदीप ओमप्रकाश कुडीया (वय–३२ वर्षे रा. वसंत टेकडी, नगर), राम हिरालाल क्षत्रिय (वय–४६ वर्षे रा. भद्रकाली फुले मार्केट नाशिक), तौफिक सिकंदर शेख (वय–२८ वर्षे रा. नेवासा खुर्द ता.नेवासा), अजहर खुदाबक्श शेख (वय–३४ वर्षे रा. मुकुंदनगर नगर), योगेश मनोहर छजलांनी (वय–४० वर्षे रा. दरेवाडी, ता.जि. नगर), संतोष गणेश गोयल (वय– ३९ वर्षे रा. शहापूर ता.जि. नगर), विकी लक्ष्मण सुजगोहर (वय–४६ वर्षे रा. येरवडा पुणे), जितेंद्र चंद्रकांत म्हात्रे (वय– ४० वर्षे रा. भिवंडी जि.ठाणे), अमीन सरदार शेख (वय–४२ वर्षे रा. गजराजनगर, नगर), तुषार संतोष मुलतांनी (वय–२९ वर्षे रा. मंगळवार पेठ पुणे), समीर फिरोज शेख (वय–२२ वर्षे रा. अकोले नाका संगमनेर), वसीम सलीम शेख (वय–७० वर्षे रा. येरवडा पुणे), गोविंद शाम राजुडीया (वय–६३ वर्षे रा. मंगळवार पेठ पुणे), सोहेल कबीर सय्यद (वय–३८ वर्षे रा. मुकुंदनगर नगर) व उत्तम एकनाथ साळवे (वय–४० वर्षे रा. देवळाली कॅम्प, नाशिक) यांना ताब्यात घेतले.

# नगरमधून अपहार झालेले ७९ लाखांचे कापड हस्तगत

## एलसीबीची राजस्थानमध्ये कारवाई

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** नगर येथून अपहार केलेले ७८ लाख ८२ हजार १८४ रुपये किमतीचे ४७० कापडाचे रोल जप्त स्थानिक गुन्हे शाखेने राजस्थान राज्यातून हस्तगत केले आहेत. या प्रकरणी पाचजणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून, तिघांना अटक करण्यात आली आहे.

फिर्यादी अमरीशकुमार ओमप्रकाश गुप्ता (वय–५७ वर्षे रा. नारोल लांभारोड, अहमदाबाद, राज्य गुजरात) यांच्या कंपनीतील कंटेनर (जीजे २७.एच ५९३५) यावर असलेला चालक संजय लिलाधर कुमार व क्लिन्नर लिलू मिना उर्फ नंदलाल मिना यांनी संगनमत करुन एकूण ५५५ कापडाचे रोल बेंगलोर येथे घेऊन जाणे करीता विश्वासाने सोपवलेले असतांना आरोपींनी ४७० कापडाचे रोल बेंगलोर येथे न पोहचवता नगर येथून त्यांची परस्पर विल्हेवाट लावली होती. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१६ (४), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल आहे.



### पथकात यांचा सहभाग

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी तसेच तपास पथकातील उपनिरीक्षक संदीप मुरकुटे, पोलीस अंमलदार, सुनील पवार, रिचर्ड गायकवाड, फुरकान शेख, भगवान थोरात, प्रशांत राठोड, विशाल तनपुरे, महिला पोलीस अंमलदार सोनल भागवत, चालक उमाकांत गावडे अरुण मोरे यांनी केली.

एलसीबीचे पथक या गुन्ह्याचा तपास करत असताना गोपनीय माहिती मिळाली की, सदर गुन्ह्यातील आरोपींनी नवापुर (जि. नंदुरबार) या ठिकाणी वाहन उभे करुन त्यातील मुद्देमाल दुस–या वाहनात भरुन अपहार पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

# शहरात जनलोक अदालतमधून आयुष्मान भारत व वय वंदना योजनेचा जागर




**अहिल्यानगर - शहरात पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या जनलोक अदालतमध्ये सर्वसामान्य नागरिकांना शासकीय आरोग्य योजनांचा थेट लाभ मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजना तसेच आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना अंतर्गत पात्र कुटुंबांना दरवर्षी ५ लाख रुपयांपर्यंत कॅशलेस उपचार मिळावेत, यासाठी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. याचबरोबर ७० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना वय वंदना योजनेअंतर्गत कॅशलेस उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यावरही विशेष भर देण्यात आला. या उपक्रमात डॉ. अनिकेत भालसिंग (जिल्हा प्रमुख), व्ही. बी. वांडेकर (दक्षता अधिकारी), हर्षवर्धन साळवे (टीम लीडर), आरोग्यमित्र धीरज उबाळे यांच्यासह अनेक आरोग्यमित्रांनी सहभाग घेत नागरिकांना योजनांचा लाभ कसा मिळवता येईल याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. केंद्र सरकारने २०२३ मध्ये मेडिएशन ॲक्ट लागू केल्याने तसेच सर्वोच्च न्यायालयाने देशभर कम्युनिटी मेडिएशन राबविण्याचे निर्देश दिल्याने या चळवळीला नवे बळ मिळाले आहे. यापुढे शासकीय अधिकारी अशा प्रक्रियेत सहभागी होण्यास बांधील राहतील व टाळाटाळ करता येणार नाही, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. कारभारी गवळी यांनी सांगितले की, गरीब व दुबळ्या घटकांना मिळणाऱ्या आरोग्य योजनांचा लाभ रेशनकार्डातील त्रुटींमुळे नाकारला जाणार नाही. लाखो लोकांना किरकोळ कारणांमुळे योजनांपासून वंचित ठेवले जात होते; मात्र यापुढे असा अन्याय सहन केला जाणार नाही. आवश्यक असल्यास राष्ट्रीय जनलोक अदालतच्या माध्यमातून अधिकाऱ्यांना जाहीरपणे जबाबदार धरले जाईल. कोरोना काळानंतर आरोग्य सेवांचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले असून नागरिकांनी वेळ येण्यापूर्वीच शासकीय योजनांची पात्रता पूर्ण करून लाभ घ्यावा, असेही त्यांनी आवाहन केले. जनलोक अदालतच्या माध्यमातून गावागावात जनजागृती करून आयुष्मान भारत व वय वंदना योजनेची माहिती पोहोचवली जाणार आहे. भारतीय संविधानाने दिलेल्या मूलभूत अधिकारांवर काही अधिकारी अन्यायकारक पद्धतीने गदा आणत असल्याची टीका करत अशोक सब्बन यांनी सांगितले की, देशात कायद्याचे राज्य जनतेच्या साक्षीने राबविले गेले पाहिजे. भ्रष्टाचार व अनागोंदी करणाऱ्या अधिकाऱ्यांना उघड करण्याचा इशाराही त्यांनी दिला.हर्षवर्धन साळवे यांनी सांगितले की, पूर्वीची महात्मा फुले जनआरोग्य योजना आता आयुष्मान भारतच्या रूपात पुढे आली आहे. या योजनेसाठी डिजिटल रेशनकार्ड आवश्यक असून उत्पन्नाची अट नाही. डिजिटल रेशनकार्डधारकांना आयुष्मान कार्ड काढता येते. प्रत्येक कुटुंबाला ५ लाख रुपयांपर्यंत तर ७० वर्षांवरील व्यक्तींना वय वंदना योजनेचा लाभ मिळतो. लाभार्थ्यांचा मोबाईल क्रमांक आधारशी लिंक असणे अनिवार्य आहे.आरोग्यमित्र धीरज उबाळे यांनी विविध रुग्णालयांमध्ये आरोग्यमित्र व आरोग्य सेविकांच्या माध्यमातून आयुष्मान कार्ड काढण्याची सुविधा उपलब्ध असल्याचे सांगितले.अशोक सब्बन यांनी प्रशासनातील त्रुटींमुळे अनेकांना योजनांचा लाभ मिळत नसल्याचे नमूद केले. गरजूंना रेशनकार्ड ऑनलाइन करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. आरोग्य सेवांसाठी लागणाऱ्या प्रचंड खर्चामुळे सामान्य कुटुंबांचे आर्थिक कंबरडे मोडते, त्यामुळे शासनाच्या योजना प्रत्येकापर्यंत पोहोचणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.जनलोक अदालतमध्ये ॲड. अमित थोरात, शाहीर कान्हु सुंबे, ॲड. लक्ष्मणराव पोकळे, वीर बहादूर प्रजापती, संतोष खामकर, ओम कदम, पोपट शेळके, धनंजय मडके, कैलास पठारे, ॲड. विद्या शिंदे, राजेंद्र कर्डिले, दिलीप घुले, प्रकाश गोसावी आदींनी सहभाग नोंदविला.**

# टेकाडे सरांच्या मार्गदर्शनाने अनेक यशस्वी पिढ्या घडल्या - रामचंद्र दरे

### प्राचार्य शिरीष टेकाडे यांच्या सेवापूर्तीनिमित्त संस्थेच्या वतीने गौरव



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** टेकाडे सरांच्या मार्गदर्शनाने अनेक यशस्वी पिढ्या घडल्या. त्यांनी घडवलेली अनेक मुले उच्च पदावर कार्यरत आहे. विद्यार्थ्यांना त्यांनी मौल्यवान ज्ञान आणि जीवनाचे धडे देताना जिल्हा मराठा संस्थेचा नावलौकिक वाढवला असल्याचे प्रतिपादन जिल्हा मराठा संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे यांनी केले.

देहरे (ता. नगर) येथील नवभारत माध्यमिक व उच्च माध्यमिक उद्यालयाचे प्राचार्य शिरीष टेकाडे यांच्या सेवापुर्ती गौरव समारंभा प्रसंगी अध्यक्षीय भाषणात दरे बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, खजिनदार ॲड. दिपलक्ष्मी म्हसे, विश्वस्त जयंत वाघ, कार्यकारिणी सदस्य दिपकराव दरे, माजी जि.प. सदस्य संदेश कार्ले हे होते.

याप्रसंगी प्राचार्य शिरीष टेकाडे व सौ.उज्वला शिरीष टेकाडे यांचा मान्यवरांच्या हस्ते सपत्नीक सन्मान करण्यात आला. यावेळी उपाध्यक्ष डॉ. भापकर म्हणाले, गेली ३२ वर्ष टेकाडे सरांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन घडले. त्यांनी आपल्या कारकिर्दीत देहरे शाळेची खूप प्रगती केली. उत्कृष्ट आणि मेहनती मार्गदर्शक म्हणून त्यांनी वेगळा ठसा उमटवीला असल्याचे स्पष्ट केले.

खजिनदार ॲड. दिपलक्ष्मी म्हसे म्हणाल्या की, मुख्यध्यापक हे संस्थेच्या यशाचे पिलर असून जिल्हा मराठा संस्थेत टेकाडे सरांसारखे अनेक मौल्यवान लोकं आहेत. शाळेच्या भरभराटीसाठी प्रयत्न करत असताना त्यांना पत्नीची चांगली साथ लाभल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यकारिणी सदस्य दीपक दरे म्हणाले, देहरे येथील इंग्लिश मीडियम स्कूल तसेच ज्युनिअर कॉलेजचे रोपटे वाढविण्यात टेकाडे सरांचे मोलाचे योगदान आहे. विद्यार्थ्यांना त्यांनी फक्त अभ्यास शिकवला नाही तर जीवन जगण्याची कला शिकविली. माध्यमिक शिक्षक सोसायटीचे चेअरमन आप्पासाहेब शिंदे यांनी नवभारत विद्यालयाचे भौतिक वैभव निर्माण करण्याचे काम टेकाडे सरांनी केल्याचे सांगितले.

सत्काराला उत्तर देताना प्राचार्य टेकाडे म्हणाले की, संस्थेमुळे टेकाडे परिवार घडला, त्यामुळे संस्थेचे आपण कधीही उतराई करु शकत नाही. वडिलांनी दिलेल्या संस्काराच्या बळावर आयुष्यभर काम केले, ते करत असताना पत्नीने मोलाची साथ दिल्याचे सांगितले. प्रास्ताविकातून पर्यवेक्षक अंकुश बर्डे यांनी प्राचार्य शिरीष टेकाडे यांच्या जीवन पटाचा लेखाजोखा मांडला.

# आयटीआयसमोर ‘चक्री’चा अड्डा; अवैध गांजा–दारू विक्रीचेही आरोप

### विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह; कारवाईची जोरदार मागणी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** शहरातील शहागड रोडवरील आयटीआय शासकीय तंत्रनिकेतन विद्यालयासमोरील परिसरात चक्री जुगाराचे अड्डे सुरु असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. याच ठिकाणी एका किराणा दुकानातून गांजा व दारूची अवैध विक्री होत असल्याचेही आरोप नागरिकांनी केले असून यामुळे शैक्षणिक वातावरणच दूषित होत असल्याची खंत व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शेवगाव येथील काही समाजकंटकांनी या परिसरात ठाण मांडून चक्री जुगार सुरू ठेवला आहे. दिवसभर या अड्ड्यांवर गर्दी होत असल्याने विद्यार्थ्यांवर त्याचा विपरीत परिणाम होत असून अनेक पालकांनी चिंता व्यक्त केली आहे.

**‘मुलांनी शिकायचे की जुगार खेळायचा?’**

शाळा–महाविद्यालय परिसरातच अशा प्रकारचे प्रकार घडत असल्याने पालकांमध्ये तीव्र नाराजी आहे. ‘‘मुलांनी शिक्षण घ्यायचे की अशा वाईट सवयींकडे वळायचे?’’ असा संतप्त सवाल पालकांकडून उपस्थित केला जात आहे.

**अवैध विक्रीमुळे धोका वाढला**

परिसरातील एका किराणा दुकानातून गांजा व दारू विक्री होत असल्याचा आरोप अधिक चिंताजनक मानला जात आहे. अल्पवयीन विद्यार्थ्यांच्या संपर्कात अशा गोष्टी येण्याचा धोका वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

**प्रशासनाची डोळेझाक?**

सार्वजनिक ठिकाणी उघडपणे जुगार व अवैध विक्री सुरू असतानाही संबंधित यंत्रणा दुर्लक्ष करत असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. त्यामुळे प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

**तातडीने कारवाईची मागणी**

या प्रकाराला आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासनाने तात्काळ छापे टाकून कठोर कारवाई करावी, तसेच शैक्षणिक परिसर सुरक्षित ठेवण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, अशी मागणी नागरिक, पालक व सामाजिक कार्यकर्त्यांकडून होत आहे.

# आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जनतेला जलद सेवा द्या - पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पैठण–** छत्रपती संभाजीनगर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांनी पैठण पोलीस ठाण्याला भेट देत वार्षिक तपासणी केली. यावेळी त्यांनी पोलीस अधिकारी व अंमलदारांना मार्गदर्शन करत आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून जनतेला जलद, पारदर्शक आणि गुणवत्तापूर्ण सेवा देण्याचे निर्देश दिले.

**अभिलेख व शस्त्रागाराची पाहणी**

दौऱ्यादरम्यान डॉ. राठोड यांनी पोलीस ठाण्यातील अभिलेख (रेकॉर्ड), मुद्देमाल कक्ष आणि शस्त्रागाराची बारकाईने तपासणी केली. तसेच ठाणे परिसरातील स्वच्छतेची पाहणी करून समाधान व्यक्त केले.

**‘वृंद परिषद’मध्ये मार्गदर्शन**

तपासणीनंतर आयोजित ‘वृंद परिषद’ (दरबार) मध्ये पोलीस पाटील, अधिकारी व अंमलदारांशी संवाद साधताना त्यांनी तंत्रज्ञानाच्या वापराचे महत्त्व अधोरेखित केले.

**तक्रारींचे त्वरित निवारण महत्त्वाचे**

‘‘आजच्या बदलत्या काळात गुन्हे तपास व प्रतिबंधासाठी तंत्रज्ञान अत्यावश्यक आहे. पोलीसांनी आपल्या कामकाजात डिजिटल साधनांचा वापर वाढवून कार्यक्षमता वाढवावी. नागरिकांच्या तक्रारींचे तातडीने निवारण करून त्यांना सन्मानपूर्वक वागणूक देणे हे पोलीसांचे प्रथम कर्तव्य आहे,’’ असे डॉ. राठोड यांनी सांगितले. या तपासणीवेळी पैठण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महादेव गोमारे, सर्व दुय्यम अधिकारी, पोलीस अंमलदार तसेच पोलीस पाटील उपस्थित होते.

# मुला–मुलींना संतांचे संस्कार दिल्यास समाज व्यवस्थेवर सकारात्मक परिणाम – ह.भ.प. कृष्णाई महाराज महामुनी

### नालेगाव गाडगीळ पटांगण येथे बाल कीर्तनकार कृष्णाई महाराज महामुनी यांचे प्रेरणादायी कीर्तन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** नालेगाव येथील गाडगीळ पटांगण येथे श्री हनुमान जयंतीनिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताह धार्मिक वातावरणात उत्साहात सुरू असून दुसऱ्या दिवशी सात वर्षांच्या बाल कीर्तनकार ह.भ.प. कृष्णाई महाराज महामुनी यांच्या प्रेरणादायी कीर्तनाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. लहान वयातही प्रभावी शैलीत सादर केलेल्या कीर्तनातून कृष्णाई महाराज यांनी संत विचार, संस्कार आणि समाज यांचे महत्त्व अधोरेखित करत उपस्थितांची मने जिंकली. आपल्या कीर्तनात त्या म्हणाल्या की, संत हे ब्रह्मरूप स्थितीत असतात आणि त्यांच्या विचारांचे संस्कार लहानपणापासून मुलांवर होणे अत्यंत गरजेचे आहे.

जिजामाता यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना रामायण, महाभारत आणि संतविचारांचे संस्कार दिले, त्यामुळे त्यांनी आदर्श रामराज्य आणि सुसंस्कृत स्वराज्य उभे केले. त्याचप्रमाणे आजच्या पिढीवर योग्य संस्कार झाले, तर कुटुंब व्यवस्था, समाज व्यवस्था आणि राष्ट्रीय व्यवस्था अधिक सक्षम होईल, असे त्यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी मुलांना आपल्या आई–वडिलांची सेवा करण्याचे आवाहन करत संतांचे विचार आत्मसात करण्याचा संदेश दिला. धार्मिकतेच्या माध्यमातून समाज घडतो आणि चांगल्या संस्कारातून उज्ज्वल भविष्य निर्माण होते, असेही त्या म्हणाल्या.

कीर्तनाच्या शेवटी विठ्ठल नामाचा गजर, टाळ–मृदुंगाचा निनाद आणि संतांच्या जयघोषात संपूर्ण नालेगाव परिसर दुमदुमून गेला. माजी नगरसेवक दत्तात्रय मुदगल यांच्या पुढाकारातून गेल्या ३४ वर्षांपासून अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात येत असून या माध्यमातून नागरिकांमध्ये धार्मिक भावना, एकात्मता आणि संस्कार रुजविण्याचे कार्य सातत्याने सुरू आहे. या कार्यक्रमास नागरिक व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहून कीर्तनाचा लाभ घेतला.

# निमगाव वाघा येथे हरिनाम सप्ताहाची भावपूर्ण सांगता; काल्याच्या कीर्तनाने वातावरण भारावले

### श्रीराम नवमीनिमित्त ३९ वर्षांची परंपरा कायम

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथे श्रीराम नवमीनिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताह आणि ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची यंदाही भक्तिमय वातावरणात सांगता झाली. या सप्ताहाचे हे सलग ३९ वे वर्ष असून, गावासह पंचक्रोशीतील भाविक या धार्मिक सोहळ्याने भक्तीरसात न्हाऊन निघाले.

संपूर्ण सप्ताहभर हरिनामाचा गजर, भजन–कीर्तन आणि ज्ञानेश्वरी पारायणाने गावातील वातावरण भक्तीमय बनले होते. या सोहळ्याची सांगता ह.भ.प. श्रीनिवास महाराज घुगे यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. त्यांच्या प्रभावी वाणीने आणि रसाळ कथनशैलीने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले.

कीर्तनात घुगे महाराजांनी भगवान श्रीकृष्णाच्या जीवनातील विविध प्रसंगांचे अत्यंत समर्पक वर्णन केले. ते म्हणाले, ‘‘भगवान श्रीकृष्णाचे चरित्र हे केवळ कथा नसून जीवन जगण्याची दिशा देणारे आहे. त्यांनी संकटांवर मात करत धर्म, सत्य आणि कर्तव्य यांचा मार्ग दाखविला. प्रत्येक व्यक्तीने आपल्या जीवनात श्रीकृष्णाच्या तत्वांचा स्वीकार केल्यास समाजात सद्भावना आणि शांतता निर्माण होईल.’’

# शहर विकासासाठी बँका व लोकप्रतिनिधींचा समन्वय महत्त्वाचा – महापौर ज्योती गाडे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भिंगार अर्बन बँकेच्या वतीने नूतन महापौर–उपमहापौर व नगरसेवकांचा सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर धनंजय जाधव यांच्यासह नगरसेवक गणेश भोसले, अविनाश घुले, बाळासाहेब बोराटे, प्रकाश भागानगरे, विकी जगताप, दत्ता गाडळकर, रेवणनाथ पवार, पुष्पा बोरुडे, सुनीता फुलसौंदर, मंगल लोखंडे, अश्विनी लोंढे, ॲड. ऋग्वेद गंधे, सुजाता पडोळे, आशा डागवाले आदींचा सन्मान करण्यात आला.

महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, अहिल्यानगर शहराचा सर्वांगीण आणि शाश्वत विकास साधण्यासाठी आर्थिक संस्था, प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यातील समन्वय अत्यंत आवश्यक आहे. भिंगार अर्बन बँकेसारख्या संस्था केवळ आर्थिक व्यवहारापुरत्या मर्यादित न राहता समाजाच्या उन्नतीसाठी काम करत आहेत, ही अभिमानाची बाब आहे. विशेषतः महिला बचत गट, लघुउद्योग आणि नवउद्योजकांना आर्थिक पाठबळ देऊन बँक शहराच्या प्रगतीत महत्त्वाची भूमिका बजावत आहे. अशा सकारात्मक उपक्रमांमुळे समाजातील प्रत्येक घटकाला प्रगतीची संधी मिळते. या प्रसंगी बँकेचे चेअरमन अनिल झोडगे, व्हाईस चेअरमन किसनराव चौधरी, रामसुख मंत्री, नामदेव लंगोटे, राजेंद्र पतके, कैलासराव खरपुडे, विष्णू फुलसौंदर, एकनाथ जाधव, महेश झोडगे, कैलास रासकर, रुपेश भंडारी, कैलास दळवी, श्रीमती तिलोतमा करांडे, माधवराव गोंधळे, राजेंद्र बोरा तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी शशिकांत महाजन यांच्यासह मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी चेअरमन अनिल झोडगे यांनी सांगितले की, भिंगार अर्बन बँक ही नेहमीच समाजहिताचे कार्य करत आली आहे.



### पायाभूत सुविधांबरोबरच आर्थिक सक्षमीकरण महत्वाचे – उपमहापौर

**उपमहापौर धनंजय जाधव म्हणाले की, आजच्या स्पर्धात्मक युगात शहरांचा विकास हा केवळ पायाभूत सुविधांपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर आर्थिक सक्षमीकरणही तितकेच महत्त्वाचे झाले आहे. बँकांच्या माध्यमातून युवकांना रोजगाराच्या संधी निर्माण होत आहेत, बँकेच्या माध्यमातून आत्मनिर्भर बनण्याची संधी मिळत आहे आणि लघुउद्योगांना नवी दिशा मिळत आहे. या सर्व प्रक्रियेत लोकप्रतिनिधी म्हणून आम्ही नेहमीच अशा संस्थांना सहकार्य करू. भविष्यातही शहराच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांची गरज असून, नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.**

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### बांधकाम कामगारांच्या हक्कांसाठी कर्जत येथे ८ एप्रिलला जिल्हाव्यापी आंदोलन

अहिल्यानगर- बांधकाम क्षेत्रातील कामगारांना पेन्शन, त्यांच्या मुलांना शिष्यवृत्ती तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ तात्काळ मिळावा, यासाठी लोकशाही बांधकाम कामगार संघटनेच्या वतीने कर्जत येथे जिल्हाव्यापी आंदोलनाची हाक देण्यात आली आहे. येत्या ८ एप्रिल रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत कर्जत तहसील कार्यालयासमोर हे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती संघटनेचे अध्यक्ष शंकर भैलुमे यांनी दिली. संघटनेने प्रशासनाला दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडून घेतले जाणारे अनेक निर्णय हे कामगारांच्या हिताचे नसून जाणीवपूर्वक अडचणी निर्माण करणारे आहेत. त्यामुळे कामगारांना योजनांचा लाभ मिळण्यात अडथळे येत आहेत. महाराष्ट्रातील सर्व बांधकाम कामगारांना तात्काळ पेन्शन योजना लागू करावी, कामगारांच्या मुलांना शिष्यवृत्ती मिळण्यासाठी मागितली जाणारी अतिरिक्त कागदपत्रांची अट रद्द करावी, आवश्यक वस्तू संच वितरणात होत असलेली अनियमितता व फसवणूक तात्काळ थांबवावी, सर्व पात्र कामगारांना घरकुल योजना तातडीने मंजूर करावी, भविष्यात लॉकडाऊनसारखी परिस्थिती निर्माण झाल्यास प्रत्येक कामगाराला किमान १० हजार रुपयांची मदत देण्याचा शासन निर्णय () काढावा, भांडी व अत्यावश्यक वस्तू संचांचे तालुका स्तरावर ऑनलाइन वितरण सुरू करावे, इतर राज्यांच्या धर्तीवर कामगारांच्या मुलांना लॅपटॉप योजना लागू करावी, मृत बांधकाम कामगारांचे प्रलंबित अर्ज तात्काळ मंजूर करण्याची मागणी करण्यात आलेली आहे. या आंदोलनासाठी पुनम समुद्र, शालन मोहिरे, सुनिता अवचर, आशा माने, स्वप्नील जाधव, नमिता गुंड, स्वाती शिंदे, मिरा पारसे, गीतांजली अडसुळ, अशोक डांडर, रानी साळवे, आरमा शेख, समिना सय्यद, शाईन शेख, सानिया झारेकरी, दत्तात्रय लांडगे, कानिलाल भिसे, छाया सांगळे, वानू शेख, भाग्यश्री शिंदे, अब्बास तांबोळी, सुनिल जाधव, रमेश बरकटे, योगेश चव्हाण, सविता आरने, अमृत काळे, केशव दातीर, यास्मिन बागवान, चंद्रकांत चव्हाण, राजूभाई तांबोळी, शिल्पा म्हस्के, शवाना बागवान, फारुक शेख, वंदत्ता समुद्र, सारिका घोडके, राणी पिटेकर, कल्याणी थोरात, नितीन अवचार, अभिमन्यू पिटेकर, अनुप भैलुमे आदी कार्यकर्ते प्रयत्नशील आहेत.

### टाकळीमियाँ येथील सरपंच व ग्रामपंचायत अधिकाऱ्यांवर एकतर्फी कारवाईचा निषेध



अहिल्यानगर - राहुरी तालुक्यातील मौजे टाकळीमियाँ येथील सरपंच व ग्रामपंचायत अधिकाऱ्यांवर झालेल्या कथित अन्यायकारक व एकतर्फी कारवाईचा तीव्र निषेध पँथर्स भिम संग्राम सामाजिक संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे. या प्रकरणाची सखोल फेरचौकशी करून चुकीच्या पद्धतीने कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी संघटनेने केली आहे. न्याय न मिळाल्यास रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला. यासंदर्भात शहरात नुकतीच संघटनेची बैठक पार पडली. बैठकीत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची लवकरच भेट घेऊन सदर प्रकरणी सविस्तर चर्चा करण्याचा निर्णय घेण्यात आला. या वेळी संघटनेचे अध्यक्ष छानराज क्षेत्रे, टाकळीमियाँच्या महिला सरपंच लिलाबाई गायकवाड, मिलिंद काळपुंड, विजय विधाते, चंद्रकांत गायकवाड आदी उपस्थित होते. संघटनेच्या मते, ग्रामपंचायतीचे सर्व दप्तर उपलब्ध असतानाही चुकीच्या पद्धतीने चौकशी करण्यात आली. सरपंच व ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी सादर केलेले खुलासे विचारात न घेता उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर तसेच गट विकास अधिकारी, पंचायत समिती नेवासा यांनी हेतुपुरस्सर एकतर्फी निर्णय घेतल्याचा आरोप करण्यात आला. केवळ एका साध्या अर्जावरून ठोस पुराव्यांशिवाय सखोल चौकशी सुरू करण्यात आली, हे नियमबाह्य असल्याचेही सांगण्यात आले. या प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायतीतील कामांची प्रत्यक्ष पाहणी न करता, दप्तर उपलब्ध नसल्याचा बनाव केल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला.

# सत्ता ही सेवेसाठी असते, हे डॉ. नाथ पाऊलबुधे यांनी कार्यातून दाखविले - डॉ.मंदार कुलकर्णी

## शैक्षणिक संकुलातर्फे २२ व्या स्मृतिदिनी आदरांजली अर्पण

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



(छाया : विजय मते)

**अहिल्यानगर–** कोणत्याही प्रकारचा राजकीय वारसा नसताना सामाजिक,राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक जीवनामध्ये नगर शहरासह जिल्ह्यात समाजपयोगी कार्य करून सत्ता ही सेवेसाठी असते हे मूल्य जोपासत सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविण्याबरोबरच विडी कामगारांच्या वसाहतीचा प्रश्न, गोरगरीब मुला–मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न सोडवून आपल्या कार्यातून त्यांनी दाखविले.असे प्रतिपादन डॉ. मंदार कुलकर्णी यांनी केले.

वसंत टेकडी येथे सेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक स्व.माजी आमदार डॉ.नाथ पाऊलबुधे यांचा २२ वा स्मृतिदिन निमित्त सर्व शैक्षणिक युनिटच्यावतीने आदरांजली अर्पण करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे डॉ.मंदार कुलकर्णी, संस्थेचे उपाध्यक्ष रामभाऊ बुचकुल, सचिव रामकिसन देशमुख, खजिनदार दादासाहेब भोईटे सर्व युनिटचे प्राचार्य, मुख्याध्यापक, प्राध्यापक, शिक्षक वृंद आदी उपस्थित होते.

डॉ.कुलकर्णी म्हणाले डॉ.नाथ साहेब व्यवसायाने डॉक्टर होते. पण एक माणुसकी धर्म म्हणून सेवा ते रुग्णांना देत असत. गोरगरिबां विषयी त्यांना खूप आस्था असायची, पैसे न घेता ते औषध उपचार करीत चरितार्थाचे साधन म्हणून डॉक्टरकीचा व्यवसाय त्यांनी केला नाही. विधान परिषदेवर एकनिष्ठ कार्यकर्ता म्हणून श्री.शरदचंद्र पवार यांनी नियुक्ती केली.६ वर्षे आमदार असताना शहराचा विकास, विडी कामगारांचे प्रश्न, शैक्षणिक क्षेत्रातील समस्या यावर लक्ष केंद्रित करून सेवा शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना करून प्राथमिक, माध्यमिक, कॉलेज उभे केले. त्यामुळे आज परिसरातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची चांगली सोय उपलब्ध झाली असल्याचे त्यांनी सांगितले.

संस्थेचे सचिव रामकिसन देशमुख म्हणाले डॉ. नाथ साहेबांनी शैक्षणिक संकुलात लावलेले या छोट्या रोपट्याचे मोठ्या वटवृक्षात रूपांतर झाले.आज येथे इंजिनिअरिंग, फार्मसी, डीएड, बीएड, आयुर्वेद महाविद्यालय सुरू झाल्याने त्यांच्या कार्याची हे संकुल एक प्रकारे साक्ष देत आहेत.आपल्या कामावर निष्ठा ठेवून अजून समाजात शिक्षणाचे महत्त्व देण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी डॉ.पाऊलबुधे यांच्या शैक्षणिक सामाजिक आणि मानवतावादी कार्याचा गौरव आपल्या आदरांजली भाषणातून केला शिक्षणाच्या माध्यमातून समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी डॉ.पाऊलबुधे यांचे मोठे योगदान आजही आम्हाला प्रेरणादायी ठरत असल्याची भावना सर्वांनी व्यक्त केली.

# शिक्षणाने समाज घडत असतो – माजी नगरसेविका शितलताई जगताप

## प्रभाग क्रमांक १४ च्या वतीने विद्यार्थ्यांना दप्तर वाटप । स्व. अरुण काका जगताप यांच्या जयंतीनिमित्त जिजामाता विद्यालयात उपक्रम



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्वर्गीय आमदार अरुण काका जगताप यांच्या जयंतीनिमित्त प्रभाग क्रमांक १४ च्या वतीने जिजामाता प्राथमिक माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना दप्तर वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देत सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न करण्यात आला.

यावेळी माजी नगरसेविका शितलताई जगताप म्हणाल्या की, आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षणाला अत्यंत महत्त्व आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शिक्षण पोहोचले पाहिजे आणि विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध झाल्या पाहिजेत. स्वर्गीय अरुण काका जगताप यांची नेहमीच इच्छा होती की समाज सुसंस्कृत व्हावा आणि त्यासाठी शिक्षण अत्यावश्यक आहे.

त्या पुढे म्हणाल्या की, सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत करणे ही आपली जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच आपल्या कलागुणांना वाव देत जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर आपले करिअर घडवावे. तसेच चांगला समाज निर्माण करण्यासाठी विद्यार्थ्यांनी व्यसनांपासून दूर राहणे गरजेचे असल्याचा सल्लाही त्यांनी दिला. स्वर्गीय काकांचे विचार प्रेरणादायी असून त्यांच्या कार्यातून समाज घडवण्याची दिशा मिळते, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी माजी उपमहापौर गणेश भोसले म्हणाले की, जिजामाता विद्यालयात सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थी शिक्षण घेत असून त्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य स्वर्गीय अरुण काका जगताप यांच्या जयंतीनिमित्त देण्यात आले आहे. स्वर्गीय काकांना सामाजिक कार्याची विशेष आस्था होती. त्यांनी नेहमीच सर्वसामान्यांच्या सुखदुःखात सहभागी होत मदतीचा हात दिला. त्यांच्या अपेक्षेप्रमाणे सामाजिक कार्य पुढेही सुरू ठेवले जाईल, असे त्यांनी सांगितले.

या प्रसंगी माजी नगरसेविका शितलताई जगताप, माजी उपमहापौर गणेश भोसले, नगरसेवक प्रकाश भागानगरे, संजय चोपडा, नगरसेविका सुनीता फुलसौंदर, विशाल पवार, विजय फुलसौदर, विराज भोसले, मुख्याध्यापक रोहित शिदोरे, सुरेखा लोंढे आदींसह शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मनपा कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या

# चेअरमनपदी, व्हाइस चेअरमनपदी बिनविरोध निवडीबद्दल आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते सत्कार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी बाबासाहेब मुदगल व व्हाइस चेअरमनपदी कैलास चावरे यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी ज्येष्ठ संचालक जितेंद्र सारसर, संचालक सतीश ताठे, विजय कोतकर, बलराज गायकवाड, विकास गीते तसेच मनपा कर्मचारी युनियनचे सचिव आनंद वायकर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी आमदार संग्राम जगताप म्हणाले की, मनपा कर्मचारी सहकारी पतसंस्थेला उज्ज्वल परंपरा लाभली आहे. या परंपरेला साजेसं काम करत संचालक मंडळाने पुढील काळात सभासदांच्या हिताचे निर्णय घ्यावेत व संस्थेचा विकास साधावा.

दरम्यान, चेअरमन बाबासाहेब मुदगल व व्हाइस चेअरमन कैलास चावरे यांनी आपल्या निवडीबद्दल आनंद व्यक्त करत आमदार संग्राम जगताप यांनी केलेल्या सत्काराबद्दल आभार मानले. संस्थेच्या प्रगतीसाठी सर्वांच्या सहकार्याने काम करू, अशी ग्वाही त्यांनी दिली.

# आर्थिक नियोजन ही काळाची गरज - आदित्य चांदेकर

## सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचातर्फे व्याख्यानाचे आयोजन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** अन्न, वस्त्र, निवारा या जशा मनुष्याच्या मूलभूत गरजा आहेत. त्याचप्रमाणे आर्थिक नियोजन ही सुद्धा काळाची मूलभूत गरज आहे. भविष्याची वाटचाल चांगल्या पद्धतीने करण्यासाठी, आज प्रत्येकाने पैशाची नियोजन योग्य पद्धतीने करणे गरजेचे आहे. आपल्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी खर्चाचे तसेच वेळेचे नियोजन असणे महत्त्वाचे आहे. असे प्रतिपादन आर्थिक सल्लागार व ग्राहक पंचायतीचे सदस्य आदित्य चांदेकर यांनी केले.

सावेडी जेष्ठ नागरिक मंच आणि ग्राहक पंचायत महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अर्थसंकल्प समजून घेताना आणि मृत्युपत्रा ची गरज या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. यावेळी ग्राहक पंचायत संस्थेचे अध्यक्ष गजेंद्र क्षीरसागर,कोषप्रमुख कृष्णराव बागडे, राजेंद्र कळमकर, ॲड. सिद्धार्थ वाघमारे, पंचायतचे उपाध्यक्ष दत्तात्रय सोनार मंच चे कार्यवाहक ज्योतीताई केसकर, एस आर जोशी, बलभीम पांडव, बाजीराव जाधव, मनोहर केसकर, हरिश्चंद्र थिगळे, पुष्पा चितांबर, शिरीष कुलकर्णी, वैशाली भणगे उपस्थित होते.

यावेळी ते पुढे म्हणाले की, प्रत्येकाचे आज बँकेमधील खाते हे जॉईंट स्वरूपाचे असावे. आपल्या इच्छेने मृत्युपत्र सर्वांनी रजिस्टर पद्धतीने तयार करून ठेवावे. तसेच पेन्शनर लोकांनी आपल्या नातवंडांच्या शिक्षणासाठी पैसे योग्य तेथे गुंतवावे. राष्ट्रीयकृत बँकेत आपला आर्थिक व्यवहार असावा व त्यामध्येच आपल्या डिपॉझिट खाते असावे.

# पुनम साबळे – सावंत यांना पीएच.डी. प्रदान

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पैठण–** येथील रंगारहट्टी परिसरातील पुनम मुरलीधरराव साबळे – सावंत यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ मार्फत मराठी विषयात पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली.

कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयातील मराठी विभागाचे प्रा. डॉ. रामचंद्र झाडे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी ''मराठवाड्यातील वारकरी संत परंपरेचे साहित्य : एक अभ्यास'' या विषयावर संशोधन प्रबंध सादर केला होता. संबंधित प्रबंधास विद्यापीठाने मान्यता दिल्यानंतर त्यांना ही पदवी बहाल करण्यात आली.


त्यांची मौखिक परीक्षा विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. रमेश जाधव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बाह्य परीक्षक म्हणून सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठ च्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदीप सांगळे उपस्थित होते.

या यशाबद्दल शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले, मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. सर्जेराव जिगे, डॉ. दासू वैद्य, डॉ. प्रतिभा अहिरे, मराठी विभाग प्रमुख डॉ. शिवाजी हुसे, मार्गदर्शक डॉ. रामचंद्र झाडे तसेच प्रीतम सावंत यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# श्रीरामनवमीला थोरले श्रीराम मंदिरात 'आज अयोध्या सजली' नृत्यनाटिकेने निर्माण केला भक्तिमय जल्लोष

## । श्री गुरुमाऊली संगीत विद्यालयाचा भव्य कलाविष्कार; नृत्य–नाट्याच्या माध्यमातून श्रीराम कथा सजीव
## । ''प्रभू श्रीरामचंद्र की जय'' घोषणांनी दुमदुमले मंदिर प्रांगण; प्रेक्षक झाले राममय

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** श्रीरामनवमीच्या पावन निमित्ताने नेप्ती येथील कल्याण रोडवरील श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज उपासना संस्थानच्या थोरले श्रीराम मंदिराच्या भव्य प्रांगणात ''आज अयोध्या सजली'' या श्रीराम कथेवर आधारित नृत्य–नाटिकेचा अद्भुत आणि नयनरम्य कलाविष्कार सादर करण्यात आला. श्री गुरुमाऊली संगीत विद्यालयाच्या वतीने सायंकाळी ६ वाजता हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. सी.बी. कुलकर्णी, डॉ. सौ. गौरी कुलकर्णी, अशोकजी जरीवाला, विलासजी बडवे व सौ. वर्षा पंडित यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन व गोंदवलेकर महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

सुरुवातीला ''श्री रामचंद्र कृपालु भजमन'' या भक्तिगीतावर सादर झालेल्या नृत्याने वातावरण भक्तिमय झाले. त्यानंतर ''हम कथा सुनाये राम सकल गुणधाम की'' या गाण्यावर श्रीराम कथेची सुरेख मांडणी करत नृत्य–नाटिकेची सुरुवात झाली. नृत्य आणि नाट्य यांच्या प्रभावी संगमातून श्रीरामाची कथा हळूहळू उलगडत गेली आणि प्रत्येक प्रसंग लयबद्ध सादरीकरणातून जिवंत झाला.

कार्यक्रमादरम्यान प्रेक्षक अक्षरशः मंत्रमुग्ध झाले होते. ''प्रभू श्रीरामचंद्र की जय'' अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. श्रीराम अयोध्येत परतल्याचा प्रसंग आणि 'त्रिवार जयजयकार' या गाण्याने कार्यक्रमाची सांगता झाली. यामुळे उपस्थितांना जणू प्रत्यक्ष अयोध्येतील उत्सव अनुभवण्याचा आनंद मिळाला.

श्री गुरुमाऊली संगीत विद्यालय निर्मित ''आज अयोध्या सजली'' ही नृत्यनाटिका यापूर्वी गोव्यातही अनेक मान्यवरांसमोर सादर झाली असून हा तिचा पाचवा प्रयोग होता. नवीन विद्यार्थी कलाकारांच्या सहभागातूनही हा प्रयोग यशस्वीपणे पार पडला.

विद्यालयाच्या संचालिका नृत्य तपस्वी सौ. वर्षा चंद्रकांत पंडित यांनी या कार्यक्रमाचे नृत्य व नाट्य दिग्दर्शन केले. विशेष म्हणजे त्यांनीच माता कौसल्या, गुरू विश्वामित्र व रावण या तीन महत्त्वाच्या भूमिका प्रभावीपणे साकारत उपस्थितांना अचंबित केले.

''राममंदिरात समर्पित केलेली ही सेवा खऱ्या अर्थाने रुजू झाली,'' असे त्यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमाचे निवेदन सौ. भक्ती मंगेश पुराणिक यांनी केले. की–बोर्डवर श्री. अंबरीश जहागिरदार आणि तबल्यावर श्री. आनंद ऋषी यांनी उत्कृष्ट साथसंगत केली. गायन शाखेतील लहान विद्यार्थी श्रीयांश घोडके याने नृत्यासाठी बोलाची पढंत करून सर्वांची वाहवा मिळवली.

या कार्यक्रमात विद्यालयाच्या भरतनाट्यम शाखेतील तब्बल ४२ विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. आस्था पिंगळीकर, रिया सरोवरे, दर्शना दंडवते, पूर्वा म्याना, ललिता सकट, कार्तिकी गुंजाळ, आरोही साबळे, मानवी डेरे, नीलाक्षी वामने, ज्ञानेश्वरी झगडे, देविका साळुंखे, दिव्या राणे, ईश्वरी भापकर, वेरोनिका जाधव, तनया येनगुल, सृष्टी गंधे, रेवती घोटणकर, स्नेहा विखे, मुग्धा भालेराव, कावेरी एकलहरे, श्रेया जाधव, दूर्वा गायकवाड, शुभ्रा मस्तोळी, स्वराली बोरुडे, माही मिसाळ, मीरा जऱ्हाड, शौर्या कांबळे, जानवी बोरुले, अन्वी भोईटे, सर्वांगी आंबेकर, वेदिका साठे, रिजूल शिंदे, शांभवी क्षीरसागर, प्रार्थना सुपलकर, जुईली शिंदे, त्रिशा लहारे, मनस्वी कदम, सुमुखी लोखंडे, कादंबरी साळुंके आदी विद्यार्थिनींचा समावेश होता.

मेरा युवा भारततर्फे जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा उत्साहात

# युवकांना सकारात्मक दिशेने प्रवृत्त करण्यासाठी क्रीडा हे अत्यंत प्रभावी साधन - सत्यजीत संतोष

## युवक-युवतींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत सांघिक व वैयक्तिक बक्षिसे पटकाविली



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** युवा कार्यक्रम एवं खेल मंत्रालयाच्या मेरा युवा भारत या उपक्रमांतर्गत अहिल्यानगर येथे जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले. शहरातील न्यू आर्ट्स, कॉमर्स व सायन्स महाविद्यालयाच्या जिमखाना मैदानावर या स्पर्धा पार पडल्या. विविध क्रीडा प्रकारांमध्ये युवक-युवतींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत सांघिक व वैयक्तिक स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करत बक्षिसे पटकावली.

स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभास मेरा युवा भारतचे जिल्हा युवा अधिकारी सत्यजीत संतोष, महाविद्यालयाचे उपप्राचार्य अनिल आठरे, जिमखाना चेअरमन अनंत पंडित, तसेच शरद मगर, धन्यकुमार हराळ, रमेश गाडगे, श्रीकृष्ण मुरकुटे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी व खेळाडू उपस्थित होते.

उपप्राचार्य अनिल आठरे म्हणाले की, ''आजच्या या क्रीडा स्पर्धांमधून विद्यार्थ्यांमधील उर्जा, आत्मविश्वास आणि संघभावना स्पष्टपणे दिसून येत आहे. शिक्षणाबरोबरच क्रीडा हे व्यक्तिमत्त्व विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे माध्यम आहे. खेळामुळे शारीरिक तंदुरुस्ती तर वाढतेच, पण मानसिक बळ, निर्णयक्षमता आणि नेतृत्वगुणही विकसित होतात. प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एक तरी खेळ आत्मसात केला पाहिजे. या स्पर्धा केवळ जिंकण्यासाठी नसून, सहभागातून शिकण्यासाठी आणि स्वतःला घडवण्यासाठी असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हा युवा अधिकारी सत्यजीत संतोष म्हणाले की, ''मेरा युवा भारत या उपक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे देशातील युवकांना सकारात्मक दिशेने प्रवृत्त करणे आणि त्यांच्या अंगभूत गुणांना वाव देणे. क्रीडा हे त्यासाठी अत्यंत प्रभावी साधन आहे. ग्रामीण व शहरी भागातील युवकांना एकत्र आणून त्यांना समान संधी देणे हे आमचे ध्येय आहे. खेळातून केवळ शरीरच नव्हे तर मन आणि विचारही मजबूत होतात. त्यामुळे युवकांनी मोबाईल व सोशल मीडियापेक्षा खेळाच्या मैदानाकडे अधिक लक्ष देण्याचे त्यांनी आवाहन केले.

वैयक्तिक स्पर्धांचे निकाल:

१०० मीटर धावणे (मुली) : प्रथम- रजनी मिश्रा, द्वितीय- आरती जवरे, तृतीय- रूपाली दानवे

२०० मीटर धावणे (मुले) : प्रथम- साहिल खाटेकर, द्वितीय- महेश माळी, तृतीय- आदित्य माळी गोळा फेक (मुली) : प्रथम- ऋतुजा जवरे, द्वितीय- पल्लवी रोकडे, तृतीय- रिया शर्मा

गोळा फेक (मुले) : प्रथम- ओम टकले, द्वितीय- प्रतीक परभणे, तृतीय- तुषार आजबे

सांघिक स्पर्धांचे निकाल:

खो-खो : प्रथम- रिया शर्मा व संघ (ग्रुप), द्वितीय- सोनाली नायका (बी ग्रुप) व्हॉलीबॉल : प्रथम- छत्रपती ग्रुप, द्वितीय- वीरेंद्र क्लब कबड्डी : प्रथम- सहयोग क्रीडा मंडळ, द्वितीय- वाडिया पार्क या स्पर्धांच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाच्या जिमखाना विभागाचे विशेष सहकार्य लाभले. उत्कृष्ट नियोजन आणि शिस्तबद्ध आयोजनामुळे स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडल्या.

अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक क्रेडिट सोसायटी

# शहीद जवान प्रशांत बुचुडे यांच्या कुटुंबीयांना १ लाखांची आर्थिक मदत

## सामाजिक बांधिलकी जपणारी संस्था




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या वतीने पारनेर येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण सोहळा, सेवानिवृत्त सभासदांचा कृतज्ञता सोहळा तसेच शहीद जवान मदत निधी वितरणाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. यावेळी शहीद जवान प्रशांत बुचुडे यांच्या कुटुंबीयांना संस्थेच्या वतीने १ लाख रुपयांचा धनादेश देऊन मदत करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पारनेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथजी दाते होते. प्रमुख पाहुणे म्हणून जी.एस. महानगर बँकेच्या अध्यक्षा श्रीमती गीतांजलीताई शेळके व डॉ. भाऊसाहेब खिलारी उपस्थित होते. यावेळी संस्थेचे चेअरमन आप्पासाहेब शिंदे, व्हा. चेअरमन अर्जुन वाळके, माजी चेअरमन विनायकराव उंडे, माजी संचालक विलास भांड, बाळासाहेब राजळे, तसेच शरदराव पाटील, सतीश गायकवाड, एस. डी. आंधळे, सुदाम दळवी, सोपानराव गवते, बापूराव होळकर, कानिफनाथ गायकवाड यांच्यासह संचालक मंडळातील आप्पासाहेब जगताप, महेंद्र हिंगे, सुधीर कानवडे, बाजीराव अनभुले, साहेबराव रकटे, सुरज घाटविसावे, किशोर धुमाळ, शिवाजी लव्हांडे तसेच महिला संचालिका वर्षाताई खिलारी व वैशालीताई दारकुंडे व्यासपीठावर उपस्थित होते.

कार्यक्रमास पारनेर तालुक्यातील सभासद बंधू-भगिनी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. संस्थेचे चेअरमन आप्पासाहेब शिंदे यांनी संस्थेचा इतिहास, आर्थिक स्थिती तसेच शिक्षकांच्या विविध प्रश्नांची माहिती आपल्या मनोगतातून दिली. अध्यक्ष आ. काशिनाथ दाते यांनी शिक्षकांच्या प्रश्नांवर शासनस्तरावर योग्य तो विचार करून कारवाई केली जाईल, अशी ग्वाही देत संस्थेच्या समाजोपयोगी उपक्रमांचे कौतुक केले. गीतांजलीताई शेळके यांनी मनोगतात सांगितले की, देशाच्या रक्षणासाठी बलिदान देणारे जवान आहेत म्हणून आपण सुरक्षित आहोत. त्यांच्या कठीण प्रसंगी समाजाने त्यांच्या कुटुंबीयांच्या पाठीशी उभे राहणे गरजेचे आहे.

संस्थेचे संचालक विजय पठारे यांनी प्रास्ताविकात विविध उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कानिफनाथ गायकवाड यांनी केले तर आभार शरदराव आंधळे यांनी मानले. देशासाठी बलिदान देणाऱ्या जवानाच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत करून अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक क्रेडिट सोसायटीने सामाजिक बांधिलकी जपली आहे. हा उपक्रम अत्यंत स्तुत्य असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## भगवान महावीर जयंतीनिमित्त उद्या सायंकाळी आनंदधाम येथे भक्तीसंध्या कार्यक्रम

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जगाला शांती आणि अहिंसेचा संदेश देणाऱ्या भगवान महावीर स्वामी यांची जयंती (जन्म कल्याणक) मंगळवार दि. ३१ मार्च २०२६ रोजी साजरी होत आहे. यानिमित्ताने नगर शहरात भव्य शोभायात्रा, चौक सजावट, रांगोळी स्पर्धा होणार आहे. याच दिवशी संध्याकाळी ७ वाजता जैन सोशल फेडरेशनच्या वतीने आनंदधाम येथे एक सूरमई शाम, प्रभूभक्ती के नाम या भक्तीसंध्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यात स्वर तारिका अंकिता ब्रम्हे




व स्वर सरताज सुनील झुंजे हे आपल्या समधूर आवाजात भक्ती गीते सादर करून भाविकांना मंत्रमुग्ध करणार आहेत. तरी या कार्यक्रमास भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ व श्री तिलोकरत्न स्थानकवासी जैन धार्मिक परीक्षा अहिल्यानगर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

भगवान महावीर स्वामी जन्म कल्याणक दिनानिमित्त उद्या ३१ मार्च रोजी

## जिल्ह्यातील सर्व कत्तलखाने व मांस विक्री दुकाने बंद ठेवण्याबाबत जिल्हा प्रशासनाचे आदेश जारी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भगवान महावीर स्वामी जन्म कल्याणक दिवस हा दिनांक ३१ मार्च २०२६ रोजी भारतासह संपूर्ण जगात मोठ्या भक्तिपूर्ण वातावरणात साजरा केला जाणार आहे. आपल्या अहिल्यानगर जिल्ह्यातही मोठ्या भक्तिपूर्ण वातावरणात साजरा केला जाणार आहे.

भगवान महावीर स्वामी यांनी जगाला जागा आणि जगू द्या,अहिंसा परमो धर्म चा संदेश दिला.

महाराष्ट्र शासन तसेच ॲनिमल वेलफेअर बोर्ड ऑफ इंडिया आदेश पत्रकानुसार सदर आदेशाचे दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील काटेकोर पालन संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये केले जावे याकरिता सकल जैन समाजाच्या वतीने यश प्रमोद शहा (ॲनिमल वेलफेअर बोर्ड एच ए डब्ल्यू आर सदस्य भारत सरकार तथा मिशन सेफ विहार ग्रुप अध्यक्ष )या नात्याने माननीय जिल्हाधिकारी साहेब आणि जिल्हा प्रशासन यांना विनंती केली होती की आपण तात्काळ याबाबतचे आदेश पत्रक अहिल्यानगर संपूर्ण जिल्हा करिता पारित करण्यात यावे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने त्या अनुषंगाने शासन आदेशानुसार संपूर्ण अहिल्यानगर जिल्हा करिता आदेश पत्रक जारी केले आहे. आणि जिल्ह्यात सदर आदेशाची काटेकोर अंबलबजावणी आवश्यक ती कारवाई करण्यात करिता या आदेशाची प्रत जिल्हा पोलिस अधीक्षक, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी,आयुक्त महानगरपालिका,उपायुक्त पशुसंवर्धन,सर्व उपविभागीय दंडाधिकारी, सहआयुक्त नगरपरिषद प्रशासन,सर्व तहसीलदार तथा सर्व दंडाधिकारी आणि संबंधित विभाग या सर्वांना पाठवून त्यांना आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत पत्रक जारी करण्यास सांगितले आहे.

यश शहा यांनी देखील जिल्हा पोलिस अधीक्षक, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी,आयुक्त महानगरपालिका आणि संबंधित सर्व अधिकारी यांना संपर्क साधून आदेश पत्रकाची जिल्ह्यात काटेकोर अंबलबजावणी आवश्यक ती कारवाई करण्यात करिता विनंती केली आहे.याबाबत संबंधित अधिकारी यांनी देखील तत्काळ आपआपल्या विभागात आदेशाची काटेकोर अंबलबजावणी आवश्यक ती कारवाई करण्यात करिता सूचना दिल्या आहेत.

# एआय वरून बंदूक हातात घेतलेला फोटो बनवला अन् स्टोरीला ठेवला; दोन जणांवर गुन्हा दाखल

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**कोपरगाव–** कोपरगाव तालुक्यातील कोळपेवाडी येथे एका व्हायरल फोटोमुळे निर्माण झालेल्या भीतीच्या वातावरणाचा अखेर पोलिसांनी सखोल तपास करून मोठा उलगडा केला आहे. हातात -४७ रायफल आणि कंबरेला पिस्तूल असल्याचा फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर परिसरात मोठी खळबळ उडाली होती. साधा फळ विक्रेता असलेल्या तरुणाकडे एवढी घातक शस्त्रे कशी आली, याबाबत नागरिकांमध्ये भीती आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते.

२८ मार्च २०२६ रोजी तोफिक बिलाल बागवान (वय २६, रा. कोळपेवाडी, ता. कोपरगाव) याच्या ''-५४५७'' या इंस्टाग्राम आयडीवर हा फोटो प्रसारित झाला होता. हा फोटो समोर येताच कोपरगाव तालुका पोलीस स्टेशनने घटनेची गंभीर दखल घेत तात्काळ तपास सुरू केला. पोलीस निरीक्षक श्री. संदीप कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी श्री. कमलाकर चौधरी, सपोनि श्री. धर्मसिंग सुंडे, पोहं/एम.बी. दहीफळे, पोहं/एस.डी. बोडे, पोका/एन.एम. तांबरे, पोका/जे.डी. गावरे, पोका/आर.जी. खरातोडे, पोका/आर.डी. शेख, पोका/एन.डी. जाधव तसेच श्रीरामपूर (मोबाईल सेल) येथील पोलीस कर्मचारी सचिन धनवट यांच्या पथकाने आणि च्या विशेष पथकाने संयुक्त कारवाई करत संबंधित तरुण व त्याचा मित्र इस्माईल रज्जाक शहा (वय ३९) यांना तात्काळ ताब्यात घेतले.सखोल चौकशीत समोर आलेली माहिती अत्यंत धक्कादायक ठरली. हा फोटो प्रत्यक्षात खरा नसून द्राक्षांच्या बागेत काढलेल्या मूळ फोटोवर आर्टिफिशियल इंटेलिजन्स () च्या मदतीने एडिट करून तयार करण्यात आला होता. इस्माईल रज्जाक शहा याने आपल्या मोबाईलवरून हा फोटो तयार करून तोफिक बागवानच्या हातात -४७ रायफल आणि कंबरेला पिस्तूल दाखवले आणि नंतर तो फोटो सोशल मीडियावर प्रसारित केला. या प्रकारामुळे परिसरात निर्माण झालेली भीती लक्षात घेता पोलिसांनी तपास अधिक वेगाने केला. आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर समाजात तणाव निर्माण होऊ शकतो, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, हे माहिती असूनही हा फोटो व्हायरल करण्यात आल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे.

दरम्यान, पोलिसांनी तोफिक बागवान यांच्या घराची झडती घेतली असता एक तलवार आढळून आली असून ती जप्त करण्यात आली आहे. या संपूर्ण प्रकरणी कोपरगाव तालुका पोलीस स्टेशन येथे गु.र. नं. १०९/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १९२, ३५३(१) (ब) तसेच शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ४/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई मा. श्री. सोमनाथ घारगे (पोलीस अधीक्षक, अहमदनगर), मा. श्री. सोमनाथ वाघचौरे (अपर पोलीस अधीक्षक, श्रीरामपूर) आणि मा. श्री. अमोल भारती (उपविभागीय पोलीस अधिकारी, शिर्डी विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली आहे.

या संपूर्ण प्रकरणातून एक गंभीर वास्तव समोर आले आहे. सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या गोष्टींची सत्यता तपासल्याशिवाय त्यावर विश्वास ठेवणे किती धोकादायक ठरू शकते, हे या घटनेने दाखवून दिले आहे. सारख्या प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करून कोणतीही खोटी प्रतिमा तयार करून समाजात भीती आणि गोंधळ निर्माण केला जाऊ शकतो. पोलिस प्रशासनाने नागरिकांना स्पष्ट आवाहन केले आहे की, कोणतीही माहिती पडताळणीशिवाय पुढे पाठवू नये, अफवा पसरवू नयेत आणि सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर करावा. अन्यथा अशा प्रकारच्या कृत्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.कोळपेवाडीतील या घटनेने संपूर्ण तालुक्याला एक मोठा धडा दिला असून, डिजिटल युगात सजग आणि सतर्क राहण्याची गरज अधोरेखित केली आहे.

# बडेवाडीमध्ये मंगळवारी होणार श्री क्षेत्र भगवानगडाचा ९२ वा नारळी सप्ताह प्रारंभ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**भगवानगड–** श्री संत भगवानबाबांनी प्रारंभ केलेल्या नारळी सप्ताहाच्या ९२ व्या वर्षीचे यजमानपदाचे शिवधनुष्य हे भगवानगडाच्या दक्षिण बाजूला असलेल्या बडेवाडी ग्रामस्थांनी उचलले आहे. श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती, ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांच्या मार्गदर्शनाखाली सप्ताहाची तयारी अंतीम टप्प्यात आली असुन मंडप उभारणीचे काम पूर्ण झाले आहे.

श्री संत भगवानबाबांनी फिरता नारळी सप्ताहाचा नाविन्यपुर्ण उपक्रम ९२ वर्षांपूर्वी श्री क्षेत्र नारायणगडाच्या पायथ्याशी असलेल्या पखालडोह या ठिकाणी सुरू केला. त्यांचे पश्चात तीच सप्ताहाची परंपरा श्री क्षेत्र भगवानगडाचे द्वितीय उत्तराधिकारी अष्टपैलू संत, वै.ह.भ.प.गुरुवर्य श्री संत भिमसिह महाराज यांनी सुरू ठेवत बाबांचे कार्य सुरू ठेवले होते. वै.गुरुवर्य भीमसिंह महाराजांच्या वैकुंठगमनानंतर श्री क्षेत्र भगवानगडाचे तृतीय उत्तराधिकारी तथा विद्यमान मठाधिपती ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली या सप्ताहाची एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे. हा नारळी सप्ताह वैभवशाली असल्याने संपूर्ण महाराष्ट्रातून लाखो भाविक सप्ताहामध्ये आठवडाभर उपस्थित असतात. नारळाचे यजमानपद स्विकारलेले ग्रामस्थ आठवडाभर तन, मन आणि धन खर्ची घालत श्रीगुरूंची सेवा करत असतात.

३१ मार्च रोजी हा महोत्सव प्रारंभ होत असुन सप्ताहामध्ये ह.भ.प. महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांच्या मार्गदर्शनाखाली भागवताचार्य ह.भ.प. श्री.प्रकाश महाराज साठे यांच्या अमृततुल्य रसाळवाणीतून ७ दिवस भव्य श्रीमद् भागवत कथा निरूपण सोहळ्याचा उपस्थित लाखो भाविकांना




लाभ होणार आहे. सप्ताहामध्ये ह.भ.प.महंत श्री.रामगिरी महाराज (येळेश्वर संस्थान येळी), ह.भ.प. भागवताचार्य श्री.तुकाराम महाराज मुंडे शास्त्री, ह.भ.प.श्री.ज्ञानेश्वर महाराज जळकीकर, ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर, ह.भ.प.श्री.प्रभाकर महाराज बोधले पंढरपूरकर, श्री क्षेत्र भगवानगडाचे उत्तराधिकारी ह.भ.प.महंत श्री.कृष्णा महाराज शास्त्री यांच्या कीर्तन सेवा होणार असून सप्ताहाच्या सातव्या दिवशी रात्री ठीक ८:३० ते ११ या वेळेत श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांचे जागराचे जाहीर हरीकीर्तन होणार आहे. त्यानंतर काल्याच्या दिवशी श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ. श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांचे अमृततुल्य काल्याचे कीर्तन होईल. त्यानंतर महाप्रसादाने सप्ताहाची सांगता होईल. सप्ताहामध्ये दररोज पहाटे काकडा भजन, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, हरिपाठ इ. धार्मिक कार्यक्रमही होतील.

**महंत नामदेव महाराज शास्त्रीजींचा अभिनव उपक्रम**

यंदा उष्णता जास्त असल्यामुळे भाविकांना कीर्तन ऐकताना उकाड्यापासून मुक्तता मिळावी म्हणून सप्ताहातील सर्व कीर्तनं मोकळ्या जागेत होणार आहेत. तर दिवसभरातील कार्यक्रमासाठी भव्य मंडपाची उभारणी केलेली आहे.

## कॅप्टन खरात कडून कोट्यावधींची फसवणूक झालेल्या गोंदकर परिवाराच्या पाठीशी आम्ही सर्वजण उभे राहून न्यायासाठी लढा देऊ – नगरसेवक नंदू गोंदकर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शिर्डी–** शिर्डी परिसरात जमीन फसवणुकीचा एक गंभीर प्रकार उघडकीस आला असून भोंदूबाबा अशोक खरात आणि मध्यस्थांनी गोंदकर कुटुंबीयांची फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून पीडित कुटुंबीयांनी शिर्डी पोलीस तसेच नाशिक येथील एसआयटीकडे तक्रार दाखल केली आहे.

शिर्डीतील रावसाहेब गोंदकर यांची निघोज हद्दीत वडिलोपार्जित सुमारे ४ एकर शेती होती. या शेतीवर गोंदकर कुटुंबीय शेती करून आपल्या उदरनिर्वाहाचा आधार चालवत होते. दरम्यान या परिसरात पंचतारांकित हॉटेल उभारल्यानंतर ही जमीन मोक्याच्या ठिकाणी आली आणि तिचे बाजारमूल्य वाढले. त्या मुळेच भोंदूबाबा अशोक खरात यांची नजर या जमिनीवर पडल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे.

कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार रावसाहेब गोंदकर यांच्या भोळेपणाचा फायदा घेत काही व्यक्तींनी त्यांच्याशी जवळीक वाढवली. त्यानंतर त्यांच्या मुलाला दारूच्या नशेत ठेवून संगनमताने जमिनीचा व्यवहार भोंदूबाबा अशोक खरात यांच्या नावावर करून घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. दरम्यान, दिनांक २३ मार्च रोजी नातेवाईक व गावातील नागरिकांकडून फोन आल्यानंतर गोंदकर कुटुंबीयांना जमीन विक्री झाल्याची माहिती मिळाली. याबाबत मुलगा रावसाहेब याच्याकडे चौकशी केली असता त्याने २२ ऑगस्ट २०२३ रोजी सुमारे ५ कोटी ५२ लाख रुपयांच्या मोबदल्यात जमीन विक्री केल्याचे सांगितले. मात्र संबंधित व्यवहारातील रक्कम कुटुंबीयांनासह रावसाहेब याला मिळालेली नसल्याच कुटूंबियांनी सांगितले आहे. मुलगा रावसाहेब याच्या एका मित्राने व्यवहार करून पैसे स्वतः घेतले आहे. तसेच या व्यवहारातून आमच्या कुटुंबाला एकही रुपया मिळाला नसल्याचेही गोंदकर कुटूंबियांनी सांगितले आहे. शेतकरी रावसाहेबचा मित्राने संबंधित भोंदूबाबा अशोक खरात यांच्याकडून दोन टक्के व्याजाने पैसे घेतले होते. कर्ज फेडता न आल्यामुळे त्याने आमच्या कुटुंबाची जमीन खरात यांच्या नावावर विक्री केल्याचे सांगितले. हा संपूर्ण प्रकार पूर्वनियोजित कट असून मुलाला नशेच्या आहारी लावून आणि फसवणूक करून वडिलोपार्जित मालमत्ता बळकावण्यात आल्याचा गंभीर आरोप गोंदकर कुटुंबीयांनी केला आहे. आमच्या जमिनीचे सध्याचे बाजारमूल्य ४० कोटी रुपयांपेक्षा अधिक असल्याचा अंदाज गोंदकर कुटूंबियांनी व्यक्त केला आहे. मात्र व्यवहार करताना मुलाला रकमेबाबत कोणतीही ठोस माहिती नसताना हा व्यवहार पूर्ण करण्यात आला असल्याचही कुटूंबियांनी सांगितले आहे. या प्रकरणी गोंदकर कुटुंबीयांनी शिर्डी पोलीस तसेच नाशिक कडे आज लेखी तक्रार दाखल केली असून संबंधित आरोपींवर गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे. आमची जमीन ही आमची काळी आई आहे. माझा सासू-सासऱ्याने कष्टाने घेतलेली होती.

(पान १ वरून)

## नगरमधून अपहार झालेले ७९ लाखांचे कापड हस्तगत

केला आहे. पथकाने तात्काळ नवापूर येथे सीसीटीव्ही फुटेज व गोपनीय माहितीच्या आधारे तात्काळ जयपुर राजस्थानपर्यंत सलग चार दिवस सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली व गुन्ह्यातील मुद्देमाल मोहम्मद युनुस सलाउद्दीन (रा. तालछापर ता. सुजानगढ, जि. चुरु राजस्थान) व त्याचे साथीदार यांच्याकडे लपवून ठेवला असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पथकाने राजस्थान येथे जाऊन मोहम्मद युनुस सलाउद्दीन (

वय-४९ वर्षे रा. तालछापर, ता.सुजानगढ, जि.चुरु राजस्थान), बाबुलाल जिवनराम जाट (वय-३२ वर्षे रा. रनधिसर ता.सुजानगढ, जि.चुरु राजस्थान), मोहम्मद अमिर सज्जाद (वय -३३ वर्षे रा. चुडीमियाँ ता.लक्ष्मणगढ, जि.सिकर राजस्थान) यांना ताब्यात घेऊन चौकशी केली पुण्यातील मुद्देमाल संजय लिलाधर कुमार व लिलु मिना उर्फ नंदलाल मिना यांनी मनोहारठाणा (जि. झालवाड राजस्थान) याठिकाणी लपवून ठेवला असल्याचे सांगितले. त्यानंतर सदर ठिकाणी जाऊन ७८,८२,१८४ रुपये किमतीचे एकूण लहान-मोठे ४७० कापडाचे रोल हस्तगत करण्यात आले. पुढील तपास कोतवाली पोलीस करीत आहेत.